वाचले :- म. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन
क्रमांक- एलआरएफ-३१८६/२६१७८/प्रकरण-५५५१/ग. ६.
दिनांक १ फेब्रुवारी १९८८.

......

क्रमांक-ब/कक्ष. २/गायरान/२/१६५९.
जिल्हाधिकारी धुळे यांचे कार्यालय.
धुळे दिनांक 26.२.१९८८.

आ दे श :

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील उपरोक्त ज्ञापनान्वये मंजूरी दिल्याने मी जिल्हाधिकारी धुळे महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम १९७१ चे नियम ५ व ६ अन्वये भोगाधिकार मुल्यरहित व तारण माफीने मौजे नांदरखे तालुका नंदुरबार येथील गट नं. १२० पैकी ३ हेक्टर २५ आर जमीन आश्रमशाळेसाठी [शाळेची इमारत व क्रिडांगण] म. चेअरमन इंदिरा महिला सेवा सोसायटी नंदुरबार यांना मंजूर करीत आहे.

तसेच उक्त जमिनीपैकी [गट नं. १२० पैकी] क्रिडांगणासाठी शासनाचे प्रेस वरील निम्नांकित [illegible] ७ नुसार प्रतिवर्षी नाममात्र भाडे रु. १/- आकारुन १५ वर्षांच्या भाडेपट्ट्याने मंजूर करीत आहे.

शासनाने उपरोक्त ज्ञापनान्वये प्रश्नांकित जमिन "गायरान" मधून वगळण्याची सविस्तर कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याने मी जिल्हाधिकारी धुळे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २२ अन्वये सदर क्षेत्र "गायरान" मधून वगळणेचे आदेश देत आहे.

मजकूर आश्रमशाळेस वरील जमीन खालील शर्तीवर मंजूर केली आहे.

शर्ती :-

१] संस्थेस महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्याखालील केलेले नियम बंधनकारक राहतील.

२] संस्थेस ज्या कारणासाठी मंजूर केली आहे. त्याच कारणासाठी संस्थेने तिचा उपयोग करावा. त्या व्यतिरिक्त अन्य कारणासाठी सदर जमिनीचा उपयोग करु नये.

३] संस्थेने आश्रमशाळेच्या इमारतीसाठी मंजूर झालेल्या जमिनीवर इमारतीचे पक्के बांधकाम प्रस्तुत आदेशाचे तारखे पासून किंवा जमिनीचा ताबा घेतल्यापासून दोन वर्षाचे आंत केले पाहिजे.

४] संस्थेने इमारत बांधण्यापूर्वी तिचा आराखडा स्थानिक ग्राम पंचायतिकडून मंजूर करून घेवून त्याप्रमाणेच बांधकाम केले पाहिजे.

५] संस्थेस प्रस्तुत जमीन नवीन शर्तीने मंजूर केली असल्याने सदर जमिनीची म. जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय परस्पर गहाण, हस्तांतर, विक्री अगर तब्दीली करू नये.

६] उपरोक्त जमिनीत असलेल्या गौण खनिजांवर शासनाची मालकी राहील त्यामुळे संस्थेस गौण खनिजांची परस्पर विल्हेवाट लावता येणार नाही.

७] मंजूर केलेल्या जमिनीवर संस्थेने आदेशाचे तारखे पासून अगर जमिन ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आंत दर चौरस मीटरला १ या प्रमाणे झाडे लावावीत व त्यांची योग्य निगा राखावी.

८] संस्थेस मंजूर केलेल्या जमिनीची भविष्यकाळात सार्वजनिक कामासाठी शासनास गरज भासल्यास सदर जमीन संस्थेस कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता अगर शासनाच्या बांधकाम खात्याने जमिनीवरील बांधकामाची निश्चित केलेल्या किंमती इतकी नुकसान भरपाई देवून जमीन सरकार जमा करण्यात येईल.

९] संस्थेने महाराष्ट्र जमीन महसूल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट ] नियम १९७१ चे नियम ८ मधील नमुना नंबर १ मध्ये शासकीय इमारतीसाठी मंजूर केलेल्या जमिनीची व नियम ७ मधील नमुना दोन मध्ये शेती प्रयोजनासाठी भाडेपट्ट्याने मंजूर केलेल्या जमिनीची सनद प्रस्तुत आदेशाच्या तारखे पासून दोन महिन्याच्या आंत करून दिली पाहिजे.

१०] वरील पैकी कोणत्याही एका शर्तीचा भंग झाल्यास संस्थेस मंजूर करण्यात आलेली जमीन तिच्यावरील बांधकामासह कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सरकार जमा करण्यात येईल.

( सही/- अजय भोरजकर )
( जिल्हाधिकारी, धुळे )

प्रति,
म. चेअरमन,
इंदिरा महिला सेवा सोसायटी नंदुरबार जि. धुळे.

प्रतिलिपी - मुळ कागदपत्रासह म. तहसिलदार नंदुरबार यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- प्रस्तुत कामी संस्थेस शाळा इमारतीसाठी मंजूर केलेल्या ३ हेक्टर ४५ आर जमिनीचा ताबा सनद करून घेतल्यावर द्यावा व पूर्तता अहवाल पाठवावा.

प्रतिलिपी - म. उप विभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

जिल्हाधिकारी धुळे करिता.